निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २७८ वा.
शुक्रवार :१२ डिसेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


## महाराष्ट्र नक्षलवाद मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर - मुख्यमंत्री फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/ प्रतिनिधी**/ केंद्र सरकारने २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद हद्दपार करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, महाराष्ट्र हे लक्ष्य साध्य करण्याच्या अगदी उंबरठ्यावर आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्यातील दूरदर्शी धोरणे आणि पोलिसांच्या अथक प्रयत्नांमुळे नक्षलवाद प्रचंड प्रमाणात कमी झाला असून उरलेला विस्तारही लवकरच संपुष्टात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



दुर्गम भागात नवीन पो- लीस चौक्या - नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे निर्दे श

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,अतिदुर्गम परिसरात पोलिसांची पोच वाढवण्यासाठी नवीन पोलीस चौक्या उभाराव्यात.आवश्यक मनुष्यबळ व सुविधा पुरवाव्यात.ज्या गावांमध्ये नवीन चौक्या उघडल्या जातील, तेथे नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध कल्याणकारी कार्यक्रम, सरकारी योजनांचा लाभ, रोजगार संधी, सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.

**शूर पोलिसांना गौरव - गडचिरोली पोलिसांना एक कोटी बक्षीस**

नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण घडवून आणणाऱ्या गडचिरोली पोलिसांच्या कार्याचे कौतुक करताना मुख्यमंत्री म्हणाले की, बक्षीस घोषित नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण पोलिसांमुळे शक्य झाले आहे.

नक्षलवाद मोडण्यामध्ये प्रभावी कामगिरी केलेल्या अधिकाऱ्यांना पदोन्नती दिली जावी.

गडचिरोली पोलिसांना १ कोटी रुपयांचे बक्षीस देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी.

मंत्रालय स्तरावर गडचिरोलीसंबंधित कोणताही विषय आल्यास तो प्राधान्याने निकाली काढावा.

**गडचिरोलीत नवीन पोलीस अधीक्षक कार्यालय व ३३ नवीन वाहने**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी गडचिरोली येथे नवीन पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या कामाला गती देण्याचे निर्देश दिले. तसेच पो- लीस दलासाठी ३३ नवीन वाहनांच्या खरेदी प्रक्रियेला मंजुरी देण्यास सांगितले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालिका रश्मी शुक्ला यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पोलीस उपमहानिरीक्षक अंकित गोयल यांनी या वेळी सादरीकरण केले.

**नक्षलवाद्यांचा 'आनंदोत्सव' असलेल्या ठिकाणीच नवीन पोलीस चौकी**

यापूर्वी ८ ऑक्टोबर २००९ रोजी ला- हेरी (ता. भामरागड) येथे नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात १७ जवान शहीद झाले होते. या ठिकाणी नक्षल्यांनी आनंदोत्सव साजरा केला होता. त्याच ठिकाणी पोलीस चौकी उभारून पोलिसांनी ठाम प्रत्युत्तर दिले, ज्यामुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

नक्षलवादाला विकासकामांचे प्रत्युत्तर

गडचिरोली जिल्ह्यात अनेक महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांना गती देण्यात आली आहेः

धोडराज - निलगुंडा - कवंडे १७.३० किमी रस्त्याचे काम

**कोरमा नाला पूल आणि बेद्रे पूल बिजापूरपर्यंत रस्ते जोडणी**

इंद्रावती नदीवरील ७५० मीटर पुलाची निर्मिती (दामरंचा - सांद्रा मार्ग)

२०२२ पर्यंत असलेले २७१ मोबाईल टॉवर वाढवून २०२३-२५ दरम्यान ५२१ नवीन मोबाईल टॉवर






## अर्थसंकल्पाद्वारे जनतेच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न -सचिव डॉ. विलास आठवले

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/ प्रतिनिधी**/राज्यातील जनतेच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याचा संकल्प करून त्यासाठी निधीची तरतूद करणे, विधिमंडळाच्या पटलावर हा दस्त ठेवून त्यास मंजूर करुन घेत पुढे निधीचे वितरण संबंधित विभागांना करण्याची संपूर्ण प्रक्रिया अर्थसंकल्प मांडताना पाळली जाते, अशी माहिती राज्य विधानमंडळाचे सचिव डॉ. विलास आठवले यांनी राज्यभरातील विविध विद्यापिठांच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आज येथे दिली.

विधानभवनामध्ये आयोजित ५१ व्या राष्ट्रकुल संसदीय अभ्यास वर्गात 'अर्थसंकल्प मंजूर करण्याची प्रक्रिया' विषयावर डॉ. आठवले यांनी विचार मांडले. राज्य विधानमंडळाच्या सचिव मेघना तळेकर यावेळी उपस्थित होत्या.राज्यघटनेतील तरतुदीनुसार देशातील सर्व शासकीय विभागांना आगामी काळात येणाऱ्या खर्चाचे विवरण देणे क्रमप्राप्त असते.

त्यानुसार प्रत्येक राज्यामध्ये वित्त व नियोजन विभाग हा त्या राज्यातील सर्व विभागाकडून खर्चाचे विवरणपत्र एकत्र करतो. यानंतर वित्तीय विवरणपत्र तयार करण्यात येते. जनतेच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सरकारद्वारे आगामी वर्षाच्या उद्देशपूर्तीचा अंदाज बांधला जातो व तसे नियोजन करण्यात येते. शासनाकडे विविध कर व अन्य माध्यमातून येणारा महसूल व आगामी खर्च याचा ताळमेळ करण्यात येतो, असे डॉ. आठवले म्हणाले.

शासनाच्या संपूर्ण विभागांकडून प्राप्त मागणीच्या आधारे वित्त व नियोजन विभाग अर्थसंकल्प तयार करतो. ही संपूर्ण प्रक्रिया गोपनीय असते. विधिमंडळाच्या पटलावर अर्थसंकल्प मांडल्यानंतर विधानसभेत तो मंजूर करण्यात येतो व दोन्ही सभागृहात त्यावर चर्चा होते.

अर्थसंकल्प मंजूर करण्याचा अधिकार फक्त विधानसभेलाच आहे, असे नमूद करत विधानमंडळाने पारीत केलेला अर्थसंकल्प राज्यपालांच्या मंजुरीसाठी पाठविण्यात येतो व पुढे त्याचे अधिनियमात रूपांतर होते.

विविध जनकल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी अर्थसंकल्पातील निधींचे विविध लेखाशिर्षाद्वारे संबंधित विभागांना वितरण करण्यात येते. भारताचे महानियंत्रक या अर्थसंकल्पातील खर्चाची तपासणी करतात.



अर्थसंकल्पातील आकस्मिक व एकत्रित निधी, विविध कल्याणकारी योजनांवर होणारा खर्च, करांद्वारे शासनास प्राप्त होणारा निधी, वित्तीय वितरणपत्र तसेच धनविधेयकासंदर्भातील विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे अधिकार आदींविषयी विविध उदाहरणांद्वारे डॉ. आठवले यांनी विषयाची सविस्तर मांडणी केली.विधिमंडळाच्या विशेषाधिकारांबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

याविषयावर प्रकाश टाकतांना जनतेतून निवडून येऊन राज्य विधिमंडळाचे सदस्य होण्याची प्रक्रिया, सदस्यास देण्यात येणारी शपथ, जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी सदस्याकडून करण्यात येणारा संसदीय आयुधाचा उपयोग याविषयी त्यांनी माहिती दिली. सर्वसामान्य जनतेसाठी कायदे तयार करणारे विधीमंडळ व त्याचे सदस्य यांची मानहानी करणारे वक्तव्य व सदस्यांना कर्तव्यापासून दूर करण्याची कृती किंवा सदस्याची प्रतिमा मलिन करणे हे विधीमंडळ सदस्याच्या विशेषाधिकाराचे उल्लंघन समजण्यात येते.

विधीमंडळ व त्याच्या सदस्यांचा आदर सामान्य माणसांनी राखणे अपेक्षित असते. त्याचे उल्लंघन झाल्यास विशेषाधिकार समितीकडे हा विषय जातो. या समितीला अर्धन्यायिक अधिकार प्राप्त असल्याने विधीमंडळ व सदस्यांचे विशेषाधिकार अबाधित राखल्या जातात. ही बाब डॉ. आठवले यांनी विविध उदाहराणांद्वारे समजावून सांगितली.

## वनसेवा मुख्य परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना मुलाखत तयारीसाठी 'आर्टी'तर्फे आर्थिक सहाय्य

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या 'वनसेवा मुख्य परीक्षा-२०२४' उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जातीच्या मातंग व त्यातील तत्सम उमेदवारांना मुलाखतीच्या तयारीसाठी अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) मार्फत १० हजार रुपये आर्थिक सहाय्य योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांना १० हजारांचे एकरकमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. मुलाखतीसाठी पात्र झालेल्या उमेदवारांनी लाभ घेण्याचे आवाहन आर्टीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे यांनी केले आहे.

मुलाखतीची तयारी अधिक प्रभावीपणे करता यावी आणि उमेदवारांवरील आर्थिक ताण कमी व्हावा, हा आर्थिक सहाय्य या योजनेमागचा मुख्य उद्देश आहे.या संदर्भातील सविस्तर जाहिरात आणि ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया 'आर्टीच्या' अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी:उमेदवारांनी 'आर्टी'च्या http:// https://arti.org.in या संकेतस्थळाला भेट देवून छजढखउए इज-ठऊ या लिंकवर तपशील पहावा, तसेच अर्ज भरण्यासाठी https://forms.gle/BSh7vMVDNonGK4C18 या लिंकवर गुगल फार्म भरावा.

## तिन्ही दलांच्या सामर्थ्यामुळे राष्ट्राची प्रगती - राज्यपाल आचार्य देवव्रत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/देशात शांती असेल तरच समाज आणि राष्ट्राची प्रगती साध्य होते. आपली तिन्ही सैन्य दलं सक्षम असल्यामुळेच देश सुरक्षित आहे, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

सशस्त्र सेना ध्वज दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यातर्फे आयोजित सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन मोहिमेचा शुभारंभ राज्यपालांच्या हस्ते लोकभवन, मुंबई येथे झाला. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना राज्यपालांनी सन्मानपत्र प्रदान केले.

सैनिकांचे पुनर्वसन हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य - राज्यपाल

राज्यपाल म्हणाले-भारतीय सशस्त्र सेना ही देशाच्या सन्मान व गौरवाचे प्रतीक आहे.सैनिक सीमा रक्षण करताना प्राणाची बाजी लावतात; काहींना वीरमरण येते तर काहीजण अपंग होतात.अशा वीरांच्या कुटुंबांचे पुनर्वसन करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे.नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य आपत्कालीन प्रसंगी सैन्य दल तत्परतेने नागरिकांच्या मदतीसाठी धावून येते.ध्वज दिन निधीचा उपयोग - जिल्हाधिकारी सौरभ कटियार

संकलित निधीचा उपयोग पुढील कामांसाठी केला जातो:

शहीद सैनिकांच्या कुटुंबांना आर्थिक मदत

जखमी/अपंग सैनिकांचे पुनर्वसन



माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी कल्याणकारी योजना

सैनिकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी सहाय्य,सैनिक कल्याण बोर्डाच्या विविध उपक्रमांना निधी,उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा गौरवग़,ध्वज संकलन मोहिमेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल कोकण विभाग, विविध जिल्हाधिकारी, आयुक्त, उपविभागीय अधिकारी, शिक्षण निरीक्षक, निबंधक, उत्पादन शुल्क, परिवहन, अन्न व नागरी पुरवठा विभागातील अधिकारी यांचा सन्मान राज्यपालांनी केला. नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांच्यावतीने मेजर आनंद पाठरकर यांनी सन्मान स्वीकारला.उपस्थितांमध्ये व्हाइस ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन, लेफ्टनंट जनरल डी.एस. कुशवाहा, एअर व्हाइस मार्शल प्रशांत वडोदकर, विविध दानशूर संस्था, शाळा, महानगरपालिका, सरकारी व खाजगी विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## गुटखा उत्पादन आणि विक्रेत्यांवर'मकोका' लागू होणार 'एफडीए'मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/ प्रतिनिधी**/गुटखा उत्पादन आणि विक्रेत्यांची गुन्हेगारी साखळी तोडण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मकोका लागू करण्याची घोषणा विधिमंडळ अधिवेशनात केली असून यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या (एफडीए) कारवाईसाठी बळकटी येणार असल्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी म्हटले आहे. याबद्दल मंत्री झिरवाळ यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत.

परराज्यातून अवैध मार्गाने राज्यात मोठ्या प्रमाणात गुटखा आणि सुगंधी सुपारी आणली जाते. यावर ' एफडीए'च्या जप्ती आणि फौजदारी कारवाईनंतरही विक्री होत असल्याने या गुन्हेगारी साखळीला रोखण्यासाठी 'महाराष्ट्र संघटित गुन्हे प्रतिबंधक कायदा' (मकोका) अंतर्गत कारवाईचा निर्णय घेण्याची प्रक्रिया अन्न व



औषध प्रशासन विभागाच्या पातळीवर सुरू असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मकोका कारवाई करण्याची घोषणा करून विभागाच्या प्रस्तावाचे समर्थन केले आहे, असे मंत्री झिरवाळ म्हणाले.मकोका कारवाईची घोषणा करताना गुटखा व अंमली पदार्थांवरील कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी कठोर विशेष कायदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. 'महाराष्ट्र संघटित गुन्हे प्रतिबंधक कायदा' (मकोका) अंतर्गत कारवाईचा निर्णय घेतला जाईल,असे मुख्यमंत्री यांनी विधिमंडळ अधिवेशनात स्पष्ट केले.

गुटखा, सुगंधी पान मसाला यावर राज्यात बंदी असूनही शाळा महाविद्यालयांच्या व परिसरातील दुकानांत गुटखा उत्पादन व विक्रेत्यांकडून नियमबाह्य विक्री केली जाते. गुटखा विक्री कारवाई अधीक प्रभावी व्हावी यासाठी गुटख्यासह सुगंधी सुपारी विक्रेत्यांनाही मकोकाच्या कक्षेत आणले जाणार आहे, तसा प्रस्तावच विधि व न्याय विभागाला पाठवणार असल्याची माहिती या पूर्वी अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली आहे.


# गोपीनाथ मुंडे ठरवतील ते होते असे मानले जायचे

गोपीनाथ मुंडे हे महाराष्ट्रातील राजकारणात अत्यंत प्रभावशाली आणि ठाम नेतृत्व असलेले नेते मानले जातात. त्यांनी राजकीय कारकीर्दीत प्रचंड समर्थक वर्ग तयार केला आणि बीड जिल्ह्यात त्यांच्या वर्चस्वाची पायाभरणी केली. मुंडे राजकारणात पुढे जाण्यास सुरुवात केली, तसेच त्यांच्या सभोवतालचे अनेक सहकारी त्यांच्यापासून हळूहळू दुरावले. परंतु या दुरावलेल्या लोकांमुळे मुंडे यांच्या राजकीय स्थानावर फारसा परिणाम झाला नाही, कारण त्यांचे स्वतःचे नेतृत्व, जनसमर्थन आणि कार्यकर्त्यांशी असलेला सखोल संबंध हा मजबूत होता.महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीमध्ये मुंडे यांच्या अनेक मोहर्यांनी पक्ष बदलला, जे त्यांच्या शक्तीवर काही प्रमाणात परिणाम झाले. याचा फायदा खास करून राष्ट्रवादी काँग्रेसने घेतला. उदाहरणार्थ, मुंडे यांचे निकटचे सहकारी माजी खासदार जयसिंहराव गायकवाड यांनी मुंडे यांच्यावर नाराजी व्यक्त करून राष्ट्रवादीत प्रवेश केला आणि तिथून खासदारपदी निवडून आले. कालांतराने त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यपद्धतीचा आभास झाला आणि ते पुन्हा भाजपमध्ये परतले.मुंडे यांच्या इतर काही निकटवर्तीयांनीही पक्ष बदलला. खासदार व माजी महसूल राज्यमंत्री उदयनराजे भोसले काँग्रेसमध्ये गेले, तर माजी खासदार हरिभाऊ राठोड, भाजपचे आमदार प्रकाश शेंडगे, आणि विमल मुंदडा यांनीही पक्ष बदलला. विशेष म्हणजे, विमल मुंदडा यांनी पक्ष बदलले तरी मुंडे कुटुंबाशी आपला स्नेह कायम ठेवला. गेवराईतील माजी आमदार अमरसिंह पंडित यांनीही मुंडे यांच्यापासून दूर जात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पूर्वी टी.पी. मुंडे, विनायक मेटे, बदामराव पंडित, फुलचंद कराड यांसारख्या नेत्यांनीही पक्ष सोडला होता, परंतु त्यानंतर काही जण पुन्हा भाजपमध्ये परतण्याच्या मार्गावर आहेत.

गोपीनाथ मुंडे यांना केवळ राजकीय नेते म्हणून नव्हे, तर एक ठाम निर्णय घेणारा व्यक्तिमत्व म्हणूनही ओळखले जायचे. लोक आणि सहकारी अनेकदा त्यांच्या निर्णयांची वाट पाहत असत, कारण मुंडे जे ठरवतील, ते निश्चितपणे अंमलात येईल असे मानले जात असे. त्यांच्या कार्यपद्धतीत स्पष्टता आणि ठामपणा होता, ज्यामुळे राजकीय वातावरणात अनेकदा संघर्ष किंवा मतभेद निर्माण झाले तरी त्यांच्या निर्णयांवर कुणीही प्रश्न उपस्थित करत नसत.

मुंडे हे केवळ आजच्या परिस्थितीवर आधारित निर्णय घेणारे नेते नव्हते, तर भविष्यातील परिणामांचा विचार करून धोरण आखणारे होते. त्यामुळे त्यांच्या सभासद, प्रशासक, आणि पक्षातील इतर नेते त्यांच्या निर्णयांमध्ये पूर्ण विश्वास ठेवत. हेच कारण आहे की, मुंडे यांच्या नेतृत्वाखाली अनेक प्रकल्प, विकासकामे आणि सामाजिक उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण झाले.त्यांच्या ठाम व्यक्तिमत्वामुळेच राजकीय सहकारी आणि विरोधकही त्यांचा आदर करत, त्यांच्या निर्णयांवर विश्वास ठेवत. जरी काहीवेळा त्यांचे निर्णय कठोर वाटले, तरी ते नेहमीच समाज आणि जनतेच्या हितासाठी असत, त्यामुळे लोक त्यांना जे ठरवतील तेच होईल असे मानत. त्यांच्या नेतृत्वाची ही ठामपणा आणि निर्णयक्षमतेची छाप आजही महाराष्ट्राच्या राजकारणात स्मरणीय आहे.मुंडे यांची राजकीय कारकीर्द हे नेतृत्व, कार्यकर्त्यांशी असलेला सखोल नाते आणि जनतेच्या विश्वासावर आधारित आहे, ज्यामुळे त्यांनी विरोधकांच्या अनेक प्रयत्नांना पराभूत करत आपले स्थान कायम राखले. त्यांच्या कारकीर्दीत पक्ष बदलण्याचे व विरोधकांच्या खेळाचे अनेक प्रसंग झाले, परंतु मुंडे यांनी प्रत्येक आव्हानाला सामोरे जाऊन आपली ताकद सिद्ध केली.

# गोपीनाथ मुंडे यांची जीवनशैली संघर्षमूलक



गोपीनाथ पांडुरंग मुंडे यांचा जन्म १२ डिसेंबर १९४९ रोजी बीड जिल्ह्यातील नाथ्रा या गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव पांडुरंग आणि आईचे नाव लिंबाबाई मुंडे होते. मुंडे कुटुंब पंढरपूरच्या वार्षिक वारीत अनेक वर्षे सहभागी होत असे. या वार्यांमुळे गोपीनाथ यांचे मन आध्यात्मिक मूल्यांकडे वळले आणि त्यांना लहानपणापासूनच भक्तिप्रवृत्ती मिळाली. वयाच्या १४व्या वर्षी त्यांनी पंढरपूरची वारी चालत जाऊन पूर्ण केली, आणि त्यानंतर सात वर्षे वार्यात सहभागी राहिले. तसेच, मुंडे कुटुंबाला श्रीक्षेत्र भगवानगड येथील महंत श्री संत भगवानबाबा गडकर महाराज यांचे कीर्तन ऐकण्याची संधी मिळाली, ज्याचा गोपीनाथ यांच्यावर खोल आध्यात्मिक प्रभाव झाला.

मुंडे यांचे बालपण आर्थिक दृष्ट्या कठीण परिस्थितीत गेले. १९६९ साली पांडुरंगरावांचे अकाली निधन झाले, पण त्यांच्या आई आणि मोठ्या भाव पंडित अण्णा मुंडे यांनी गोपीनाथ यांचे शिक्षण पूर्ण केले. भाऊ पंडित अण्णा यांनी स्वतःचे शिक्षण सोडून गोपीनाथ यांचा मार्गदर्शन केले. गोपीनाथ यांचे धाकटे भाऊ व्यंकट मुंडे आहेत. २१ मे १९७८ रोजी गोपीनाथ यांचे लग्न प्रमोद महाजन यांच्या भगिनी प्रज्ञा महाजन यांच्याशी आंबेजोगाई येथे झाले. त्यांना पंकजा पालवे-मुंडे, प्रीतम मते-मुंडे आणि यशश्री मुंडे या तीन मुली आहेत.

गोपीनाथ मुंडे यांनी आपले प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत पूर्ण केले, तर बी.कॉम. पर्यंतचे महाविद्यालयीन शिक्षण आंबेजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयातून केले. महाविद्यालयात असताना त्यांना समाजवादी विचारांचे प्राध्यापक बी.के. सबनीस यांचे मार्गदर्शन मिळाले, ज्यांचा त्यांच्यावर संघाच्या विचारांचा प्रभाव पडला.

तरीही, मुंडे यांनी स्वतःची विचारसरणी ठाम ठेवली आणि इतर मतांचा आदर राखला. पदवी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पुढील शिक्षणासाठी पुण्यातील विद्यापीठात प्रवेश घेतला.

मुंडे यांचे राजकीय जीवन महाविद्यालयीन विद्यार्थी संसदेतून सुरु झाले. ते प्रमोद महाजन यांचे निकट मित्र झाले, आणि या मैत्रीने त्यांच्या राजकीय प्रवासाला दिशा दिली. बीड जिल्ह्यातून त्यांनी जनसंघ आणि नंतर भाजपच्या प्रचारात सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात प्रचार केला आणि पक्षाचे पाय मजबूत केले.

गोपीनाथ मुंडे यांनी मराठवाडा विद्यापीठ आंदोलन आणि नामांतर आंदोलनात भाग घेतला व तुरुंगवासही भोगला. १९७८ साली त्यांनी बीड जिल्ह्यातील उजनी गटातून जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत विजय मिळवला. १९८० मध्ये ते रेणापूर विधानसभा मतदारसंघातून निवडून आले आणि नंतर १९९० व १९९५ मध्येही या मतदारसंघातून विजय मिळवला. सुरुवातीला भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष आणि नंतर राष्ट्रीय उपाध्यक्ष पद भूषविले.

मुंडे यांचे नेतृत्व कौशल्य अत्यंत प्रगल्भ होते. १९९५ ते १९९९ दरम्यान ते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री राहिले. या काळात त्यांनी ऊर्जा, गृह यासारख्या महत्त्वाच्या खात्यांवर काम केले आणि प्रशासन पद्धतीत सुधारणा घडवून आणल्या. त्यावेळी ते गुन्हेगारीकरणावर ताळेबंद घालण्याच्या धोरणावर ठाम राहिले. त्यांनी राज्यातील साखर कारखान्यांचे व्यवस्थापन आणि कामगार संघटनाही प्रभावीरीत्या हाताळली.

२००९ मध्ये त्यांनी बीड लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि प्रचंड मताधिक्याने विजय मिळवला. त्यावेळी त्यांच्या कन्या पंकजा पालवे यांनी प्रचारात सक्रिय सहभाग घेतला आणि नेतृत्व गुण सिद्ध केले. त्यानंतर भाजपच्या महाराष्ट्र प्रभारी म्हणूनही त्यांची नेमणूक करण्यात आली. मुंडे यांचा राजकीय अनुभव, समाजसेवा, प्रशासनिक कार्यकौशल्य, नेतृत्वाची क्षमता आणि लोकांसोबत असलेला संबंध त्यांच्या सर्वगुणसम्पन्न नेत्याचे प्रतिक आहेत.

गोपीनाथ मुंडे यांची राजकीय जीवनशैली संघर्षमूलक राहिली. आणीबाणीच्या काळात तुरुंगवास, पक्षीय आंदोलनात कष्ट, साखर कारखाना कामगारांचे संघटन, राजकारणातील गुन्हेगारीकरणाविरुद्ध लढा, तसेच विविध संकटांवर मात करून ते कायमच उभे राहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपला मराठवाडा, विदर्भ आणि राज्यातील ग्रामीण भागात मजबूत पाया मिळाला. ते मराठी अस्मितेचे प्रतीक आणि महाराष्ट्र आणि देशाच्या हितासाठी समर्पित नेते होते.

मुंडे यांचे नेतृत्व केवळ राजकारणापुरते मर्यादित नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि प्रशासनिक क्षेत्रांमध्येही त्यांनी ठसा उमटवला. त्यांच्या कार्यकौशल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला बल मिळाले आणि मराठवाड्यातील नाही तर महाराष्ट्र राज्यातील लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडवली.

तसेच देशात सुद्धा त्यांचे चाहता वर्ग मोठा आहे त्यांच्या संघर्षमूलक जीवनकथेतून एक गोष्ट स्पष्ट होते की, टिकाव, समर्पण आणि प्रामाणिक नेतृत्वानेच दीर्घकालीन बदल घडवता येतात. गोपीनाथ मुंडे हे महाराष्ट्रसह देशासाठी आणि भाजपासाठी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते, ज्यांचा प्रभाव आजही कायम आहे.

**- सुग्रीव मुंढे,मुख्य संपादक**
**दैनिक आत्ताच एक्सप्रेस**

# सर्वांसाठी आरोग्य : सामाजिक न्याय आणि मानवकल्याणाचा मार्ग

आंतरराष्ट्रीय सार्वत्रिक आरोग्य संरक्षण दिन दरवर्षी १२ डिसेंबर रोजी संपूर्ण जगभर साजरा केला जातो. आरोग्य हा मानवाधिकार आहे, कोणत्याही समाजातील आर्थिक-सामाजिक परिस्थिती, सांस्कृतिक पार्श्वभूमी किंवा राजकीय संरचना काहीही असो, प्रत्येक मनुष्याला आरोग्यसेवा मिळणे हे केवळ त्याचे मूलभूत अधिकार नसून त्या समाजाच्या सभ्यतेचे, प्रगतिचे आणि माणुसकीच्या मूल्यांचे महत्त्वाचे मोजमाप आहे. आजच्या २१व्या शतकातील वेगाने बदलणाऱ्या जगामध्ये आरोग्यसेवा हे केवळ उपचाराचे क्षेत्र राहिलेले नाही, तर ते सामाजिक न्याय, समानता, आर्थिक प्रगती, स्त्री-पुरुष समता, सामाजिक सुरक्षितता, मानवाधिकार आणि एकूण जीवनमान यांचे केंद्रबिंदू बनले आहे. जगभरातील सरकारे, धोरणकर्ते, आरोग्य तज्ञ, समाजशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय संघटना आणि स्वयंसेवी संस्था या सर्वांनी अनुभवलेले हे वास्तव आहे की, समाजाच्या विकासाचा मार्ग आरोग्याच्या पायावर उभा असतो. म्हणूनच 'सर्वांसाठी आरोग्य' ही कल्पना केवळ एखादा उद्देश नसून मानवकल्याणाचा मूलभूत पाया आहे. सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाची संकल्पना म्हणजे कोणत्याही व्यक्तीला आरोग्यसेवेची उपलब्धता आर्थिक अडचणींच्या भीतीशिवाय, भेदभावाशिवाय, समान संधींनी आणि उच्च गुणवत्तेत मिळणे होय. आरोग्यसेवेचा खर्च कुटुंबाला आर्थिक संकटात ढकलणार नाही, सामान्य माणूस उपचारासाठी कर्जबाजारी होणार नाही, ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांना शहरातील लोकांच्या बरोबरीने आरोग्यसेवा मिळेल, स्त्री-पुरुष, आदिवासी, दलित, अल्पसंख्याक, स्थलांतरित, दिव्यांग, वृद्ध, बालक, गर्भवती, माता या सर्व सामाजिक घटकांना समानतेने आणि सन्मानाने आरोग्यसेवा मिळेल, हीच सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाची सार्थ संकल्पना आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आरोग्य हे केवळ आजाराची अनुपस्थिती नसून शरीर, मन आणि समाज यांमधील संतुलन आहे. समाजाचे आरोग्य हे सामाजिक रचना, आर्थिक विषमता, शिक्षण, पोषण, रोजगार, पाणी, स्वच्छता, पर्यावरण, सांस्कृतिक समज आणि राज्यव्यवस्था यांच्या गुणवत्तेशी थेट जोडलेले आहे. म्हणूनच सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाचा विचार हा 'वैद्यकीय मॉडेल' पुरता मर्यादित नसून 'सोशल मॉडेल ऑफ हेल्थ' या विस्तृत चौकटीवर आधारित आहे. आरोग्याला सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहणे म्हणजे आरोग्यसेवेतील विषमता ही सामाजिक विषमता असल्याचे मान्य करणे होय. ज्या समाजात आरोग्य विषमता मोठी, तिथे सामाजिक विषमता घनदाट असते हे समाजशास्त्राचे मूलभूत तत्त्व आहे. म्हणूनच १२ डिसेंबर हा दिवस आपल्याला केवळ आरोग्याच्या तांत्रिक बाजूची नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित असलेल्या सामाजिक प्रश्नांचीही आठवण करून देतो.

जागतिक स्तरावर पाहता, गरीब व श्रीमंत देशांतील आरोग्य सुविधांमधील दरी चिंताजनक आहे. काही देशांमध्ये उच्च दर्जाची वैद्यकीय तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, डॉक्टर, संशोधन, औषधे यांच्या उपलब्धतेमुळे नागरिकांचे आरोग्य सुरक्षित असते; तर दुसऱ्या बाजूला अनेक देशांमध्ये लोकांना प्राथमिक आरोग्यसेवेसाठीही संघर्ष करावा लागतो. आफ्रिका आणि दक्षिण आशियातील अनेक देशांमध्ये आजही माता-मृत्यूदर, बाल-मृत्यूदर, कुपोषण, संसर्गजन्य आजार, अपुरी लसीकरण सेवा, मानसिक आरोग्याविषयीची भीती, गैरसमज आणि कमी गुंतवणूक यामुळे आरोग्यसेवा असमान आहे. यामुळे सामाजिक असमतोल वाढतो, गरीबी वाढते आणि लोकसंख्येचा मोठा भाग आर्थिकदृष्ट्या मागे राहतो. सार्वत्रिक आरोग्य संरक्षण हा या असमानतेला कमी करणारा व्यापक उपाय आहे. 'कोणालाही मागे न ठेवणे' ही संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकास ध्येयांची (डऊॠ) मुख्य संकल्पना सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाच्या माध्यमातूनच साकार होऊ शकते. सामाजिक विज्ञान असे सांगते की समाजातील कोणतीही सेवा सार्वत्रिक केली तर समाजातील दुर्बल घटकांना सर्वाधिक लाभ होतो, कारण ते पूर्वीपासूनच वंचित असतात. म्हणून सार्वत्रिक आरोग्य संरक्षण म्हणजे सामाजिक न्यायाचा सर्वात प्रभावी मार्ग होय.

भारताच्या संदर्भात पाहता, आरोग्यसेवेची आव्हाने अनेक आहेत पण संधीही तितक्याच मोठ्या आहेत. भारतासारख्या विशाल लोकसंख्येच्या देशात आरोग्यसेवा ही सर्वात मोठी सामाजिक गुंतवणूक आहे. गेल्या काही दशकांत भारताने बाल-मृत्यूदर, माता-मृत्यूदर, लसीकरण, संसर्गजन्य रोगांवरील नियंत्रण, आयुर्मानातील वाढ, ग्रामीण आरोग्य सेवा, डिजिटल आरोग्य नोंदी, टेलिमेडिसिन, आयुष्मान भारत योजना, जनऔषधी योजना आदी क्षेत्रांत महत्वपूर्ण प्रगती केली आहे. तरीसुद्धा ग्रामीण-शहरी दरी, खाजगी-सरकारी आरोग्य क्षेत्रातील असमानता, आर्थिक बोजा, वैद्यकीय शिक्षणातील तफावत, सार्वजनिक आरोग्यावरील कमी खर्च, मानसिक आरोग्याविषयी जागरूकतेचा अभाव, पोषणाच्या समस्या, समाजातील आरोग्याबाबतचे गैरसमज, तसेच सामाजिक स्तरांमध्ये असलेली दीर्घकालीन विषमता अजूनही गंभीर मुद्दे आहेत. भारतातील बहुसंख्य कुटुंबे आजही आरोग्यसेवेवर मोठा खर्च स्वतःच्या खिशातून करतात आणि अनेकदा हा खर्च कुटुंबांना दरिद्री करतो. कर्ज काढणे, सोनं गहाण ठेवणे, शेती विकणे, मुलांच्या शिक्षणात कपात करणे हे वास्तव आजही मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. समाजशास्त्रज्ञ या परिस्थितीला 'मेडिकल पावर्टी ट्रॅप' म्हणतात. लोक आजारी पडतात म्हणून गरीब होतात आणि गरीब असल्यामुळे आरोग्यसेवा मिळवू शकत नाहीत हे दुष्टचक्र तुटण्यासाठी सार्वत्रिक आरोग्य संरक्षण अत्यावश्यक आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य हे समाजाच्या आरोग्याशी जोडलेले असते. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पाहिले तर एखादा आजार एका कुटुंबापुरता मर्यादित राहत नाही; तर तो समुदायात, गावात, शहरात, देशात आणि नंतर संपूर्ण जगात पसरू शकतो. कोविड-१९ महामारीने हे सत्य जगाला पुन्हा अधोरेखित करून दाखवले आहे. महामारीने देशांची आर्थिक प्रगती ठप्प केली, शिक्षण व्यवस्था विस्कळीत केली, लाखो लोक रोजगार गमावून बसले, मनोआरोग्यावर मोठा परिणाम झाला, आरोग्यसेवांची तफावत स्पष्ट दिसू लागली, श्रीमंत-गरीब दरी आणखी वाढली आणि सामाजिक सुरक्षिततेचे महत्त्व समोर आले. यामुळे सार्वत्रिक आरोग्य संरक्षण ही संकल्पना जागतिक पातळीवर एका अत्यावश्यक मानवी अधिकारासारखी स्थापित झाली. समाजशास्त्रज्ञ सांगतात की संकटाच्या काळात समाजातील कमकुवत दुवे सर्वप्रथम तुटतात आणि म्हणूनच आरोग्य क्षेत्रातील मजबुती अत्यावश्यक ठरते.

आरोग्यसेवेतील सामाजिक अडथळ्यांचा विचार केला तर जात, वर्ग, लिंग, ग्रामीणता, गरीबी, शिक्षणाचा अभाव, सांस्कृतिक धारणा, अंधश्रद्धा, भाषिक अडथळे, परंपरा आणि सामाजिक भूमिकांचे विभाजन या सर्व घटकांचा मोठा प्रभाव आरोग्यसेवेच्या उपलब्धतेवर पडतो. उदा. महिलांना आरोग्यसेवा मिळण्यात अनेक अडथळे असतात, घरगुती कामांचा भार, आर्थिक अवलंबित्व, लाज-लज्जा, पितृसत्ताक विचारसरणी, पुरुषप्रधान निर्णयप्रक्रिया, वाहतुकीचा अभाव, प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरची अपुरी काळजी, महिलांच्या आरोग्याकडे समाजाचे कमी दुर्लक्ष या सर्व कारणांमुळे महिलांचे आरोग्य मागे पडते. आदिवासी आणि दलित समाजातील लोकांना आरोग्य केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी भौगोलिक, भाषिक, सामाजिक आणि आर्थिक अडथळ्यांचा सामना करावा लागतो. शहरी झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांना स्वच्छ पाणी, स्वच्छता व्यवस्था, पोषण, शिक्षण आणि आरोग्य सुविधा मिळण्यामध्ये प्रचंड तफावत दिसून येते. मानसिक आरोग्याच्या संदर्भात समाजातील भीती, गैरसमज, कलंक आणि उदासीनता यामुळे लोक उपचारापासून दूर राहतात. समाजशास्त्रीय दृष्टीकोन स्पष्टपणे सांगतो की आरोग्यसेवेतील असमानता ही सामाजिक शक्तींचे, सत्ता-संबंधांचे आणि संसाधनांच्या असमान वाटपाचे द्योतक आहे. म्हणून आरोग्यसेवा सुधारण्यासाठी सामाजिक संरचना सुधारावी लागते आणि हा बदल सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाच्या माध्यमातून साध्य होतो.

आरोग्य क्षेत्रातील सुधारणा ही केवळ सरकारची जबाबदारी नाही; ती संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. शाश्वत सार्वजनिक आरोग्य व्यवस्था उभी करायची असेल, तर आरोग्यसेवा, शिक्षण, पोषण, स्वच्छता, रोजगार, पर्यावरण, सामाजिक सुरक्षा आणि स्थानिक शासन हे सर्व घटक एकमेकांशी जोडले गेले पाहिजेत. समाजशास्त्रात याला 'इंटरसेक्शनॅलिटी ऑफ हेल्थ' असे म्हटले जाते. एका व्यक्तीच्या आरोग्यावर अनेक स्तरांवरील घटकांचा प्रभाव असतो आणि म्हणूनच सार्वत्रिक आरोग्य संरक्षण ही सर्वसमावेशक धोरणात्मक चौकट आहे. यामध्ये सरकारी गुंतवणूक वाढवणे, सार्वजनिक आरोग्य केंद्रांची मजबुती, डॉक्टर-नर्सांचा योग्य प्रमाणात पुरवठा, औषधांची उपलब्धता, आपत्कालीन सेवा, प्रतिबंधात्मक आरोग्य उपाय, पोषण कार्यक्रम, स्वास्थ्य शिक्षण, डिजिटल आरोग्याची सुधारणा, रोड नेटवर्क, रुग्णवाहिका सेवा, मानसिक आरोग्य सुधारणा, सामाजिक सुरक्षा योजना, महिला-सशक्तीकरण आणि आरोग्यावर केंद्रित संशोधन यांचा समावेश होतो.

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आरोग्यसेवा अधिक लोकांपर्यंत पोहोचण्याची मोठी क्षमता निर्माण झाली आहे. टेलिमेडिसिन, ई-हेल्थ रेकॉर्ड्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, मोबाईल हेल्थ ॲप्स, डिजिटल आरोग्य नोंदी, ऑनलाइन सल्लामसलत, आरोग्यविषयक माहितीचा प्रसार या सर्व माध्यमांनी ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांसाठी आरोग्यसेवा अधिक सुलभ केली आहे. परंतु डिजिटल दरीही एक सामाजिक वास्तव आहे. समाजातील आर्थिक विषमता डिजिटल साधनांच्या वापरावर परिणाम करते. म्हणून डिजिटल आरोग्य उपाय हे 'सार्वत्रिक आरोग्य' या चौकटीत बसवणे आवश्यक आहे.

सार्वत्रिक आरोग्य संरक्षण दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नसून सामूहिक संकल्पाचा दिवस आहे. हा दिवस मानवाधिकारांची, सामाजिक न्यायाची, समानतेची, सर्वसमावेशक विकासाची आणि माणुसकीच्या मूल्यांची आठवण करून देतो. आरोग्यदायी समाजच प्रगत समाज असतो. आर्थिक विकासाचा पाया आरोग्य असतो. शिक्षण, रोजगार, उत्पादन, अर्थव्यवस्था, सामाजिक स्थैर्य या सर्वांवर आरोग्याचा थेट परिणाम असतो. म्हणून आरोग्यसेवा ही 'खर्च' नसून 'गुंतवणूक' आहे. ज्या देशांनी आरोग्य क्षेत्रात व्यापक गुंतवणूक केली, ते देश अधिक स्थिर, सक्षम आणि समृद्ध झाले आहेत. सार्वत्रिक आरोग्य संरक्षण ही भविष्यातील पिढ्यांसाठी सर्वात मोठी देणगी आहे. या दिनानिमित्त आपण सर्वांनी असा विचार करणे आवश्यक आहे की समाजातील प्रत्येक व्यक्तीला समानतेने, सन्मानाने आणि सुरक्षिततेने आरोग्यसेवा मिळावी. आरोग्य ही विशेषाधिकाराची गोष्ट नसून समान अधिकार आहे आणि तो अधिकार सर्वांना मिळाला पाहिजे. म्हणूनच 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना फक्त घोषवाक्य न राहता जीवनाचा मूलभूत मार्ग बनायला हवी. जेव्हा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचेल, तेव्हा खऱ्या अर्थाने समाज आरोग्यपूर्ण, न्यायपूर्ण आणि मानवतावादी बनेल. सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाच्या माध्यमातून आपण अशीच एक निरोगी, समृद्ध, समतामूलक आणि न्यायप्रेमी जगाची निर्मिती करू शकतो, आणि हीच १२ डिसेंबरच्या या दिवसाची खरी प्रेरणा आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# केज विकास संघर्ष समिती पुन्हा आंदोलनासाठी सज्ज; रिंगरोड बायपास व बसडेपो मंजुरीसाठी मागणी




**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/प्रतिनिधी/** केज विकास संघर्ष समितीने रिंगरोड बायपास किंवा उड्डाणपुल व बसडेपो तात्काळ मंजूर करण्यासाठी पुन्हा आंदोलनाची तयारी सुरू केली आहे. समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी नवीन वर्षात आंदोलन अधिक तीव्र होईल असा इशारा दिला आहे.

समितीने केज विधानसभेच्या आमदार नमिताताई मुंदडा व केज तहसीलदार यांना निवेदन देऊन या दोन्ही प्रश्नावर शासनाकडे कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. सध्या नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन सुरु असून, आमदारांनी केजवासियांचे हा महत्त्वाचा प्रश्न अधिवेशनात मांडण्याचीही मागणी केली आहे.

केज शहर खामगाव-पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर महामार्गांच्या जोडणीत असल्याने वाहतूक वाढली आहे. विशेषतः अवजड वाहनांची संख्या वाढल्यामुळे अपघातांची शक्यता जास्त आहे. नागरिक, विद्यार्थी व वृद्धांना पायी चालणेही कठीण झाले आहे. त्यामुळे शहरातील रस्त्यांजवळ फुटपाथ तयार करणे आणि बायपास/उड्डाणपुल मंजूर करून तयार करणे आवश्यक आहे.

शहरात बसडेपो साठी साडेसात एकर जमीन आरक्षित आहे.

शासनाच्या नवीन धोरणानुसार इलेक्ट्रिक चार्जिंग सेंटरसह ई-बसडेपो सुरु करणेही सोयीचे राहील. समितीने आमदार व शासनाकडे तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी केली असून निवेदनावर हनुमंत भोसले, नासेर मुंडे, शेषराव घोरपडे व इंजिनियर मोहनराव कराड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मोकाट कुत्र्यांबाबत तक्रार नोंदविणे आता अधिक सोपे आणि जलद

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/** जालना शहर महानगरपालिकेने नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत व्हॉटसअप उहरींलु द्वारे तक्रार दाखल करण्याची अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सेवेमुळे नागरिकांना प्रत्यक्ष कार्यालयात जाण्याची गरज नाही; मोबाईलद्वारे काही क्षणांत तक्रार नोंदवता येते.

**तक्रार नोंदविण्याची पद्धत**


खाली दिलेला टठ उेवश आपल्या मोबाईलच्या कॅमेराद्वारे किंवा टठ स्कॅनरद्वारे स्कॅन करा.स्कॅन केल्यानंतर आपल्या मोबाईलवर जालना महानगरपालिकेच्या अधिकृत WhatsApp Chatbox चे विंडो आपोआप उघडेल.Chatbox मध्ये उपलब्ध पर्यायांमधून मोकाट कुत्रे किंवा संबंधित तक्रारीचा पर्याय निवडा.

महापालिकेच्या स्मार्ट प्रणालीमुळे तक्रारीचे वर्गीकरण त्वरित होते.आपली तक्रार तपशीलवार लिहा.,कुत्र्यांची संख्या,नेहमी दिसणारे ठिकाण,वेळ आणि परिसराचे नाव,गरज असल्यास फोटो किंवा व्हिडिओ पुरावा व तक्रार सबमिट करा.सबमिट केल्यावर आपल्याला तक्रार क्रमांक प्राप्त होईल. याच्या आधारे पुढील कार्यवाहीची माहिती आपल्याला वेळोवेळी मिळत राहील.महानगरपालिकेद्वारे यावर तातडीने उपाययोजना केली जाईल. नागरिकांनी ही सेवा वापरून परिसरातील सुरक्षितता राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावावी, अशी विनंती आहे.आपल्या सहकार्यामुळे जालना शहर अधिक सुरक्षित आणि सुव्यवस्थित होण्यास मदत मिळेल.

# सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर व यशवंतराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे जाहीर व्याख्यानाचे भव्य आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** चैत्यभूमीचे शिल्पकार, बौद्धाचार्यांचे जनक आणि समाज सुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सुपुत्र सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर व यशवंतराव आंबेडकर यांच्या जयंती निमित्त छत्रपती संभाजीनगरमध्ये उद्या, दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.सदर कार्यक्रम स्थानिक सत्यशोधक समाज कार्यालय, सिडको एन. ३, औरंगाबाद येथे पार पडणार असून, सूर्यपुत्र भय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर यांची धम्मचळवळ आणि आपण या विषयावर संदीप थोरात यांचे सखोल व्याख्यान संपन्न होणार आहे. या व्याख्यानाद्वारे भय्यासाहेबांच्या सामाजिक कार्याची, त्यांच्या नेतृत्वकौशल्याची आणि आंबेडकरी चळवळीतील योगदानाची सविस्तर माहिती उपस्थितांसमोर मांडली जाईल.



सत्यशोधक समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष के. ई. हरिदास अध्यक्षस्थानी असतील, तर विविध संघटनांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित राहून भय्यासाहेबांना अभिवादन करणार आहेत. कार्यक्रमादरम्यान उपस्थित लोकांना भय्यासाहेबांच्या विचारसरणीची ओळख, त्यांचे सामाजिक सुधारक कार्य, तसेच वर्तमान समाजात त्यांचा विचार कसा अमलात आणता येईल याबाबत मार्गदर्शन मिळणार आहे.

भय्यासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. भारत शिरसाठ, तसेच आनंद चक्रनारायण, रतनकुमार साळवे, अमरदीप वानखडे, अनंत भवरे, राजन कीर्तने, पंडितराव तुपे, डॉ. धनराज गोंडाने, मधुकर गवंदे, बाबुराव गवई आणि सुधाकर निसर्ग यांनी सर्व परिवर्तनवादी चळवळीतील तसेच आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना या कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

कार्यक्रमामध्ये समाजातील विविध स्तरातील लोक, विद्यार्थ्यांपासून कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांनी सहभाग नोंदवून भय्यासाहेबांच्या जीवनवृत्ताचे, त्यांची धम्मचळवळ आणि समाजासाठी केलेल्या कार्याचे साक्षात्कार घेण्याची संधी मिळणार आहे.

तसेच या व्याख्यानादरम्यान उपस्थितांना भय्यासाहेबांच्या विचारांची आणि आंबेडकरी चळवळीच्या तत्वज्ञानाची सखोल माहिती मिळणार असल्याने हा कार्यक्रम केवळ जयंती साजरा करण्यापुरता मर्यादित नसून सामाजिक जागृतीचा एक महत्त्वाचा मंच ठरणार आहे.

## डाक अदालत दि.२२ रोजी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**टपाल विभागातील सेवांबद्दल असलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासंदर्भात सोमवार दि.२२ रोजी डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर डाक विभागाच्या सेवांबाबत तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसेल अशा तक्रारींची दखल या डाक अदालत मध्ये घेतली जाते. तरी संबंधितांनी आपली डाक सेवेबाबतची तक्रार प्रवर अधीक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ यांच्या नावे दोन प्रतित दि.१९ पर्यंत अथवा त्यापूर्वी पोहोचेल अशा रितीने पाठवावी.

# संक्षिप्त

## अवैध, विलंबित जन्म मृत्यू नोंदींबाबत मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करुन कार्यवाही करा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी




**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**अवैध विलंबित जन्म मृत्यू नोंदी रद्द करुन प्रमाणपत्र परत मिळविण्याबाबत महसूल व वन विभागाने दि.१ डिसेंबर रोजी एका परित्रकाद्वारे मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत. त्याचा अवलंब करुन जिल्ह्यात कार्यवाही करा,असे निर्देश आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, मनपाचे आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा आदी उपस्थित होते. तर अन्य उपविभागीय अधिकारी हे दुरदृष्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

शासनाने दि.१ डिसेंबर रोजी परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २००० अन्वये कार्यपद्धती ठरविण्यात आली आहे. त्याअंतर्गत अवैध विलंबित जन्म मृत्यू नोंदी आहेत त्यांचे प्रमाणपत्र रद्द करुन परत मिळविण्याबाबत कार्यपद्धती देण्यात आली आहे.या सुचनांचा अवलंब करुन कालबद्ध कार्यक्रम तयार करुन हे काम पूर्ण करण्याची कार्यवाही करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

## मुलाच्या लग्नाच्या आहेराची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**मुलाच्या लग्नामध्ये आहेर न स्विकारता पत्रिकेतच क्युआर कोड देऊन त्याद्वारे रोख स्वरुपात जमा झालेला ५५ हजार रुपयांचा आहेर आज एकबोटे कुटुंबियांनी मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून जमा केला. डॉ. अभय व सौ. नंदा या एकबोटे दाम्पत्याने आज मदतीचा धनादेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या कडे सुपूर्द केला.

अतिवृष्टीमुळे अरिष्ट्यात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाथी समाजातील सर्व घटक हे मुख्यमंत्री सहायता निधीत आपले योगदान देत आहेत. डॉ. अभय एकबोटे यांच्या मुलाचे डॉ. कौशिकचे लग्न डॉ. रेया यांच्याशी शुक्रवार दि.५ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे पार पडले. या लग्नाच्या पत्रिकेत विवाह प्रसंगी वधूवरांना देण्यात येणारा आहे न स्विकारण्याबाबत एकबोटे कुटुंबियांनी आपल्या आप्तेष्टांना कळविले होते. तसेच शेतकऱ्यांसाठी मदत देण्यासाठी पत्रिकेतच क्यु आर कोड प्रसिद्ध करण्यात आला. त्याप्रमाणे आप्तेष्टांनी आपली मदत दिली. ती तब्बल ५० हजार रुपये इतकी झाली. त्यात एकबोटे कुटुंबियांनी स्वतःचे ५ हजार रुपये असे ५५ हजार रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी स्वामी यांच्या सूपूर्द केला. निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते हे यावेळी उपस्थित होते.

# आयुक्त संघ आणि पत्रकार संघ यांच्यात सुपर ओव्हर पर्यंत रंगला क्रिकेट सामना

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ४३ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये मनोरंजनासोबतच क्रीडा क्षेत्रालाही मोठा महत्त्व देण्यात आले. दि. ०८ ते १० डिसेंबर दरम्यान होणाऱ्या या तीन दिवसांच्या कार्यक्रमांत सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमांमध्ये नागरिकांना शहराच्या विकासात सहभागी होण्याची संधी देणारे उपक्रम तसेच सामाजिक जनजागृतीसाठी कार्यशाळा आणि प्रदर्शनांचे आयोजनही करण्यात आले होते.



याच कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त संघ आणि मनपा पत्रकार संघ यांच्यात छत्रपती संभाजी नगर क्रीडा संकुलात फ्लडलाइटमध्ये विशेष क्रिकेट सामना आयोजित करण्यात आला. हा सामना अत्यंत रोमांचक ठरला आणि आठ षटकांच्या अंतिम टप्प्यात जाऊन सुपर ओव्हरमध्ये रंगला.

सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आयुक्त संघाने ८ षटकांत ६८ धावांचे लक्ष्य ठरवले, ज्यामध्ये आयुक्त महोदयांनी स्वतंत्रपणे ५० धावा केल्या. पत्रकार संघाने या निर्धारित ६८ धावांचा पाठलाग करताना नक्की ६८ धावा केल्या, ज्यामुळे सामना सुपर ओव्हरमध्ये गेला. सुपर ओव्हरमध्ये पत्रकार संघाने एकूण ५ धावा केल्या, तर आयुक्त संघाने शेवटच्या षटकाराने विजय निश्चित केला. या सामन्याच्या प्रत्येक टप्प्यावर प्रेक्षकांची उत्सुकता शिखराला पोहोचली आणि खेळाडूंच्या धैर्य, कौशल्य आणि संघभावनेचे दर्शन घडले.आयुक्त संघाकडून उपायुक्त अंकुश पांढरे, सहायक आयुक्त अभय प्रामाणिक, वैद्यकीय अधिकारी डॉ. पारस मंडले, कार्यकारी अभियंता बाळासाहेब शिरसाट यांसह अनेक महत्त्वाच्या अधिकाऱ्यांचा सहभाग होता. पत्रकार संघाकडून मुख्य लेखा व वित्त अधिकारी संतोष वाहूळे, उपायुक्त नंदकिशोर भोंबे आणि अनेक इतर पत्रकारांनी सामन्यात रंगत आणली. दोन्ही संघांनी सामन्यात उत्कृष्ट कौशल्य आणि खेळभावना दाखवली, ज्यामुळे हा सामना उपस्थित सर्वांसाठी संस्मरणीय ठरला.

या कार्यक्रमातून महानगरपालिकेच्या कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी आणि पत्रकार यांच्यातील सुसंवाद आणि मैत्री दृढ झाली, तर क्रीडा क्षेत्रालाही बळकटी मिळाली. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या स्थापना दिनाच्या उपक्रमांनी नागरिकांमध्ये शहरावर गर्व आणि सामाजिक सहभाग याची भावना जागृत केली.

## गब्बर क्शन कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हफीज अली 'भारत गौरव पुरस्काराने' सन्मानित




**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** विश्व मानवाधिकार परिषद (तचझ) तर्फे प्रदान करण्यात येणारा 'भारत गौरव पुरस्कार' गब्बर क्शन कमिटीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हफीज अली यांना आज हज हाऊस येथे झालेल्या विशेष समारंभात प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. एम. आर. अंसारी, डॉ. चरणसिंग, कॅप्टन शेख हमीदुल्ला, ॲड. हादी कादरी, डॉ. फिरोज खान आणि शेख रशीद यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते हफीज अली यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमानंतर सर्व मान्यवरांचे हज हाऊस येथे स्वागत व सत्कारही करण्यात आला.पुरस्कार स्वीकारताना हफीज अली म्हणाले,

हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नाही; संपूर्ण गब्बर क्शन कमिटीचा आहे. आम्ही सदैव अवामची खिदमत केली आहे आणि इंशाअल्लाह पुढेही करत राहू. हा सन्मान अल्लाहचा करम आणि आमच्या टीमच्या मेहनतीचे फळ आहे.

गब्बर क्शन कमिटीने केलेल्या सामाजिक उपक्रमांची राष्ट्रीय पातळीवर घेतलेली दखल म्हणून हा पुरस्कार संघटनेसाठी मोठा मान मानला जात आहे. कार्यक्रमात उपस्थित सर्व मान्यवरांनी हफीज अली यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण

**आत्ताच एक्स्प्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**राज्य शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक, युवतींना मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण देण्यात येणार आहे.प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च अमृत संस्थेकडून उचलला जातो.प्रशिक्षणाचा कालावधी फक्त १० दिवसांचा आहे.प्रशिक्षणानंतर पीक पाहणी, औषध फवारणी, माती परीक्षण, बांधकाम प्रकल्पांचे निरीक्षण, प्रगतीचा अहवाल, सर्वेक्षण, भू-सर्वेक्षण, नकाशा बनवणे, हवाई चित्रीकरण, इव्हेंट कव्हरेज, पूर किंवा भूकंपासारख्या परिस्थितीत पाहणी व मदतीसह विविध संधी निर्माण होणार आहेत.



विविध अभ्यासक्रमांचा समावेश

मूलभूत एरोडायनॅमिक्स आणि ड्रोनचे प्रकार, नियम व कायदे, ड्रोन प्रणालीचे घटक आणि त्यांची देखभाल, प्रात्यक्षिक उड्डाण कौशल्ये आणि आपत्कालीन प्रक्रिया, हवामान आणि हवाई क्षेत्राचे ज्ञान या माध्यमातून घेता येणार आहे.

पात्रता आणि अर्ज प्रक्रिया

वय किमान १८ वर्षे पूर्ण, किमान १० वी पास, शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम, अर्ज प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पूर्ण केली जाते. निवड प्रक्रिया गुणवत्ता आणि स्थितीच्या आधारावर निश्चित केली जाणार आहे.

अर्ज करण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) च्या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी लागेल, किंवा जिल्ह्याच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रावर अर्जाची सविस्तर माहिती मिळणार आहे.

जिल्ह्यातून २०० जणांची निवड

अमृत संस्थेने प्रत्येक जिल्ह्यातून सर्वच घटकांसाठी विविध योजनांसाठी ५०० युवक-युवतींना मोफत प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, युवक युवतीनी प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा व्यवस्थापकअक्षय लंबे यांनी केले आहे.

# जालना महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ - भाजपा उमेदवारी अर्ज वितरण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** भारतीय जनता पार्टी, जालना महानगर शाखेतून आगामी जालना महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ साठी इच्छुक उमेदवारांचे अर्ज आज १२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता जिल्हा कार्यालयात वितरित केले जातील.या कार्यक्रमात माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, निवडणूक प्रभारी डॉ. भागवतजी कराड, माजी मंत्री बबनराव लोणीकर, जालना ग्रा. जिल्हाध्यक्ष नारायण कुचे, तसेच महानगरातील भाजपा प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

इच्छुक उमेदवार अर्ज १२-१३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मिळवू शकतील.

अर्ज भरून जमा करणे आणि मुलाखतीसाठी अर्ज १४ डिसेंबर २०२५ पासून सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्वीकारले जातील.अर्ज जमा करण्याचे ठिकाण: भाजपा जिल्हा कार्यालय, राजुरी कॉर्नर, संभाजीनगर, जालना.

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय**

**पदमपुरा परीसर, छत्रपती संभाजीनगर -४३१००५**

इ-मेल - aurangabad.eemahapwd.gov.in दुरध्वनी ०२४०-२३३१०२२

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी /२०२४/प्र.क्र.१४४ / इमा- २ दिनांक - २८/०२/२०२४**

**ई निविदा सूचना क्रं. ३५२ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर ( दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन (०५) कामांकरिता योग्य त्या वर्गातील नियमित नोंदनिकृत ठेकादाराकरिता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन / ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) http://mahapwd.gov.in

२) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील
वेबसाईटवरती कळविण्यांत येईल)

३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक

जिमाका/छ.स.न. जाहि / ४९३/२०२५ २०२६

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर**

## संतोष आवचार आणि भीमा मोरे यांची राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेस पंच म्हणून निवड

**आत्ताच एक्स्प्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारतीय सॉफ्टबॉल असोसिएशन आणि वेस्ट बंगाल सॉफ्टबॉलच्या संयुक्त विद्यमाने १४ ते १८ डिसेंबर २०२५ दरम्यान दत्ता पुलिया (वेस्ट बंगाल) येथे होणाऱ्या ४७व्या वरिष्ठ पुरुष-महिला राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी छखड प्रशिक्षक संतोष चंद्रकांत आवचार आणि भीमा मोरे यांची पंच (रेफरी) म्हणून निवड झाली आहे.




पूर्वी हे दोघे गुजरात, विशाखापटनम, आंध्रप्रदेश, उडीसा, पुरी, करणूल, छ. संभाजीनगर, नांदयाल, जळगाव, छ. संभाजीनगर, चंदीगड, अमरावती आणि इतर ठिकाणी राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून कार्यरत राहिले आहेत.

या निवडीबद्दल छ. संभाजीनगरचे जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, भारतीय सॉफ्टबॉल संघटनेचे उपाध्यक्ष आणि राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे सचिव डॉ. प्रदीप तळवेलकर, राज्य संघटनेचे सहसचिव गोकुळ तांदळे, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर, उपाध्यक्ष डॉ. फुलचंद सलामपुरे, डॉ. उदय डोंगरे, डॉ. पंढरीनाथ रोकडे, डॉ. दयानंद कांबळे, डॉ. संदीप जगताप, दीपक रुईकर, राकेश खैरनार, गणेश बेटूदे, क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार, पोलिस उपनिरीक्षक सागर रुपवते, रायझिंग स्टार स्कूलचे अध्यक्ष सुभाष निकम, सचिव अरुण निकम, मुख्याध्यापक अतुल निकम, मुख्याध्यापिका दिपाली वाकळे, उपमुख्याध्यापक संदीप चव्हाण, स्वाती निकम, प्रवीण शिंदे, सचिन बोर्डे, अजित झा, रफिक जमादार, स्वप्निल गुडेकर आदींनी अभिनंदन केले.ही निवड त्यांच्या कर्तृत्वाचे आणि सॉफ्टबॉल क्षेत्रातील कार्याचे प्रतीक आहे.

## बाबुराव गायकवाड यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर (प्रतिनिधी)** शहरातील गायकवाड वस्ती येथील रहिवासी जेष्ठ नागरिक बाबुराव जयराम गायकवाड (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी सायंकाळी सात वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, दोन मुलगे आणि एक मुलगी असा परिवार आहे. ते बाळू गायकवाड यांचे वडील होत.त्यांच्या पार्थिवावर वैजापूर येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



## सावळदबारा : मुलांसाठी पेन उपक्रम राबवणारे - गुलाबराव पाटील कोलते

सावळदबारा /प्रतिनिधी/सावळदबारा परिसरात सामाजिक कार्यासाठी ओळखले जाणारे सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील गुलाबराव पाटील कोलते यांचा एक वेगळा आणि कौतुकास्पद उपक्रम अनेक वर्षांपासून सुरू आहे. ते रस्त्याने जात असोत किंवा एखाद्या कार्यक्रमातून परतत असोत, त्यांच्या नजरेस एखादा लहान मुलगा दिसला मुलांसाठी पेन देतात. अनेक वेळा गाडीत ठेवलेली पेन व वह्यादेखील ते मुलांना भेटवस्तू म्हणून देतात.गेल्या अनेक वर्षांपासून सावळदबारा सह परिसरातील मुलांना त्यांच्याकडून भेट म्हणून पेन. वही देतात शाळेत जाणाऱ्या मुलांच्या हातात पेन पाहून त्यांचे चेहरे आनंदाने खुलून जातात.विशेष म्हणजे, सावळदबारा येथे राहणाऱ्या गुलाबराव पाटील कोलते यांच्या निवासस्थानी गल्लीतले मुलंही त्यांना भेटल्यावर पेन व वही घेऊन आनंदाने घरी जातात.

# नागरिकांनी थंडीच्या दिवसात योग्य ती दक्षता घ्यावी- जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** कुलाबा प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्राने दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. ११ ते १२ डिसेंबर २०२५ रोजीपर्यंत यलो अलर्ट जारी केला आहे. या दोन दिवशी तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे. तरी जालना जिल्ह्यातील नागरिकांनी थंडीच्या दिवसात योग्य ती दक्षता घ्यावी, आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. जिल्ह्यात लाट येण्याची शक्यता असल्याने काय करावे व काय करू नये याची माहिती पुढीलप्रमाणे आहे. १. आवश्यकता असल्यास घराबाहेर जावे अन्यथा घरीच थांबावे. २. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी उबदार कपडे आहेत याची खात्री करावी. ३. प्रसार माध्यमाव्दारे वेळोवेळी थंडीचा प्रतिकार करण्यासाठी दिलेली माहिती किंवा सूचना अमलात आण्याव्यात. ४. एकटे राहणाऱ्या वयोवृद्ध शेजारच्या व्यक्तींकडे लक्ष दयावे. ५. गरम राहणाऱ्या किंवा इमारतीमधील जास्त हवा न येणाऱ्या खोलीमध्ये वास्तव्य करावे. रूम हिटरचा वापर करावा. गरम पेय घ्यावे व शरीर उष्ण राहण्यासाठी व थंडीच्या लाटेचा प्रतिकार करण्यासाठी शरीराला तयार करावे. ६. विदुयत प्रवाह खंडीत झाल्यास फ्रीज मधील खाण्याचे पदार्थ ४८ तास व्यवस्थित राहू शकतात फक्त त्याचा दरवाजा व्यवस्थीत लागतो का ते पहावे व जास्त वेळा उघडू नये. ७. थंडी पासून बचाव करण्यासाठी टोपी किंवा मफलरचा वापर करावा. ८. रॉकेल च स्टोव्ह किंवा कोळश्याची शेगडी वापरत असाल तर त्याचा धूर जाण्यासाठी खिडकी उघडी असावी अन्यथा दुषित धुरामुळे बाधा होऊ शकते. ९. ताजे पदार्थ खावेत ज्यामुळे शरीरामध्ये उर्जा निर्माण होईल.

मादक पदार्थ किंवा अल्कोहोल मिश्रित नसलेले पेय घ्यावेत. १० हिमबाधा झाल्याचे लक्षणे दिसताच डॉक्टरांना भेटावे. स्पर्श केल्यानंतर जाणीव होत नसल्यास किंवा हाताची बोटे, कानाची पाळी, नाकाचा शेंडा यांचा रंग पांढरा किंवा फिक्कट झाल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.खालील लक्षणे आढळल्यास तात्काळ डॉक्टरांना दाखवावे -शरीर थंड पडणे. थंडी वाजणे. स्मृतीभ्रंश होणे. बोलतांना विसंगती किंवा अडखळणे, उच्चार स्पष्ट न करता येणे. अंधारी येणे, थकवा जाणवणे.

# हमीभाव खरेदी ठप्प; अर्धा माल कमी दरात विकावा लागला - आमदार बबनराव लोणीकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर/ प्रतिनिधी/** राज्यात सोयाबीन आणि कापसाच्या हमीभाव खरेदीला सुरुवात झाल्याचे शासनाचे दावे असले तरी प्रत्यक्ष परिस्थिति पूर्णपणे उलट आहे. अनेक ठिकाणी हमीभाव खरेदी केंद्रे नाममात्र सुरू असून मोठ्या प्रमाणात शेतमाल खरेदीच ठप्प आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल बाजारात कमी दराने विकण्याची वेळ आली आहे.

या गंभीर परिस्थितीवर विधानसभेत आमदार बबनराव लोणीकर यांनी सरकारला जोरदार धारेवर धरले. नाफेड आणि मार्केटिंग फेडरेशनमधील काही अधिकारी ४ लाख रुपये लाच घेतल्याशिवाय खरेदी केंद्राची मंजुरी देत नाहीत, असा खळबळजनक आरोप त्यांनी सभागृहात केला. खरेदी केंद्रासाठी मागणी करणाऱ्या एका संस्थेने ही बाब लेखी स्वरूपात आपल्या निदर्शनास आणून दिल्याचे लोणीकर यांनी स्पष्ट केले.

४ लाखांची सरळ लाच मागितली जाते - लोणीकरांचा आरोप

तारांकित प्रश्नाद्वारे बोलताना त्यांनी सांगितले की, डीएमओसह काही अधिकारी खरेदी केंद्र मंजुरीसाठी सरळ ४ लाख रुपयांची मागणी करतात.

या विधानानंतर सभागृहात एकच खळबळ उडाली. शेतकरी अडचणीत असताना त्यांच्यावर अन्याय करणाऱ्या अधिकाऱ्यांची दादागिरी किती दिवस सहन करायची? असा थेट सवालही लोणीकरांनी उपस्थित केला.

कमी दरात विक्री; शेतकऱ्यांची कंबर मोडली

हमीभाव खरेदी केंद्रांची संख्या अत्यंत



अपुरी असल्याने आणि सुरू असलेल्या केंद्रांवरील कासवगतीमुळे शेतकऱ्यांना मजबुरीने माल कमी दरात विकावा लागल्याचे लोणीकरांनी सांगितले.

अर्ध्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी माल कमी भावात विकला

सोयाबीन विक्रीत प्रति क्विंटल १००० रुपयांपर्यंतचा तोटा

उरलेला माल तातडीने हमीभावाने खरेदी न केल्यास मोठे नुकसान होणार

५० गावांमागे एक तरी खरेदी केंद्र द्या - ठाम मागणी

वास्तव परिस्थिती शासनाने ऐकून घ्यावी, असे सांगत लोणीकर म्हणाले :

किमान ५० गावांसाठी एक तरी हमीभाव खरेदी केंद्र सुरू करा. शेतकरी दररोज त्रस्त आहेत आणि काही अधिकारी मात्र लाचखोरीत गुंतले आहेत. खरेदीतील ढिलाई आणि भ्रष्टाचारावर त्वरित अंकुश आणावा.ग्रामीण भागातील शेतकरी या मागण्यांकडे आशेने पाहत आहेत. खरेदी केंद्रांची संख्या वाढली आणि खरेदी प्रक्रिया गतीमान झाली तरच शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असेही लोणीकरांनी सांगितले.शेतकऱ्यांची बाजू जोरदारपणे मांडल्याबद्दल अनेक शेतकऱ्यांनी फोन करून आमदारांना कौतुकाचे संदेश दिल्याचे समजते.

# ध्वज दिन निधी संकलनाचे उद्दीष्ट पूर्ण करावे-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** सशस्त्र सेना ध्वज दिन भारतीय सशस्त्र दलातील शूर सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांच्या योगदानाबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी तसेच विशेषतः आपले सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांकरीता विविध कल्याणाकारी योजना राबविण्यासाठी आणि मदत करण्यासाठी साजारा केला जातो समर्पित. जिह्याला ध्वज दिन निधी संकलनाचे २०२५ साठी ४६ लाख ५० हजार रूपयांचे उद्दीष्ट असून, सर्व विभागांनी आपले उद्दीष्ट पूर्ण करावे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.येथील जिल्हा सैनिक कार्यालयात आज सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलन शुभारंभाच्या कार्यक्रमात श्रीमती मित्तल बोलत होत्या. यावेळी पोलीस उपनिरिक्षक आर. डी. निकाळजे, उपशिक्षणाधिकारी (मा.) अनिल पवार, शिक्षणाधिकारी (प्रा.) संजय कायंदे, जॉन नवगिरे आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लिडर डॉ. रुपाली मानमोडे यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यावेळी म्हणाल्या की, सशस्त्र सैना दलाचे जवान व अधिकारी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अहोरात्र देशाच्या सीमांचे रक्षण करत असतात. त्यामुळेचे आपण येथे सुरक्षित व शांतते जीवन जगतो. सशस्त्र सैना दलाचे जवान व अधिकारी आपल्या जीवाची आणि आपल्या कुटूंबीयांची पर्वा न करता देश आणि आपल्या सर्वांच्या रक्षणासाठी सीमेवर सदैव तैनात असतात. देशाच्या रक्षणाची भूमिका बजावत असताना आपले जवान सैनिक सण, समारंभ, कार्यक्रम यांचा विचारही न करता ते सतत देशसेवा करत असतात. अशा लष्करी अधिकारी व जवानांची आणि त्यांच्या कुटूंबियाची काळजी घेणे ही आपणां सर्वांची नैतीक जबाबदारी आहे. या जबाबदारीच्या भावनेतून सशस्त्र सेना ध्वज निधी संकलन करण्याच्या सत्कार्याला मदत करणे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे ही श्रीमती



मित्तल यांनी यावेळी यावेळी सांगितलते.

मान्यवरांच्या हस्ते यावेळी वीर माता-पिता, वीर पत्नी, गुणवंत विद्यार्थी तसेच ध्वज दिन निधीचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या विभाग प्रमुखांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रारंभी सशस्त्र सेनेचे प्रतिक असलेले छोटे ध्वज वितरित करुन निधी संकलनाची सुरुवात करण्यात आली.यावेळी प्रास्ताविकात जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लिडर डॉ. रुपाली मानमोडे म्हणाल्या की, सन २०२४ करीता ९९ लाख २५ हजार रुपये निधी संकलन झाला असून, २९९ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. तर सन २०२५ करीता ४६ लाख ५० हजाराचे उद्दिष्ट असल्याची माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात शहिद जवानांना श्रध्दांजली वाहुन करण्यात आली तर कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला.

# जिल्ह्यातील बांधकाम कामगारांना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सर्व योजना मंडळाकडून नि:शुल्क आहेत. त्यासाठी कामगारांनी कोणत्याही प्रकारे आर्थिक व्यवहार करू नये. जर कोणतीही व्यक्ती आपणास याबाबत पैशाची मागणी करत असल्यास आपल्या जवळच्या लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरो कार्यालयाशी किंवा जालना येथील सरकारी कामगार अधिकारी कार्यालयात तक्रार नोंदवावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ हे सन २०१२ पासुन कार्यरत आहे. मंडळाचे कामकाज दि. १ जुलै २०२० पासून संपूर्ण हे संगणीकृत झालेले असून इमारत व बांधकाम क्षेत्रातील कामगारांची ऑनलाईन प्रणाली द्वारे नोंदणी, नूतनीकरण करण्यात येते. बांधकाम कामगारांची विविध माध्यमातून फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी जालना जिल्ह्यातील सर्व नोंदित सक्रीय (जीवित) बांधकाम कामगारांनी कळविण्यात येते कि या कार्यालयाकडून कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीची, बोगस संघटना, दलाल, एजंटाची नेमणूक करण्यात येत नाही तसेच याचे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालय कोणत्याही प्रकारे समर्थन करीत नाही. विविध माध्यमातून या कार्यालयाच्या नावाने बांधकाम कामगाराची नोंदणी, नूतनीकरण, विविध योजनेचे अर्ज, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच व गृहपयोगी वस्तुसंच इ. घेऊन देतो या नावाखाली स्वयंघोषित एजंट आणि संघटनांकडून बांधकाम कामगारांची फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी अशा व्यक्तीपासून कामगारांनी सावधानता बाळगावी, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# जालन्यात ज्ञान आणि भक्तीच्या संगमाचे महापर्व!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)**

जालन्यात १३ आणि १४ डिसेंबर (शनिवार आणि रविवार) रोजी 'वारकरी संत साहित्य संमेलन'ाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि जेईएस महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने होणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य आणि स्वागताध्यक्ष डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी पत्रकार परिषदेत संमेलनाबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच कार्यवाह डॉ. यशवंत सोनुने, डॉ. हेमंत वर्मा, डॉ. राजेंद्र सोनवणे आणि डॉ. बी. जी. श्रीरामे यांची उपस्थिती या प्रसंगी होती.संमेलनाचे मुख्य ठिकाण महाविद्यालयातील चुन्नीलाल जी. गोयल सभागृह असेल, आणि संमेलनाध्यक्ष म्हणून ह. भ. प. जगद्गुरू द्वाराचार्य डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर (नाशिक) यांचे स्वागत करण्यात येणार आहे.

**उद्घाटन सोहळा:**शनिवार (दि. १३) रोजी सकाळी ७.३० वाजता ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात होईल. या ग्रंथदिंडीची सुरुवात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळून होऊन डॉ. राजेंद्र प्रसाद रोड मार्गे जेईएस महाविद्यालयात पोहोचेल. या दिंडीत शहरातील भजनी मांडळे, जालना जिल्ह्यातील दहा वारकरी शिक्षण संस्थांचे विद्यार्थी आणि शहरातील शाळांचे विद्यार्थी विविध वेशभूषा आणि रंगतदार देखाव्यासह सहभागी होतील.

सकाळी ११ वाजता संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होईल. या सोहळ्यात उद्घाटक म्हणून मा. ह. भ. प. डॉ. नारायण महाराज जाधव (आळंदी देवांची) उपस्थित राहणार आहेत. संमेलनाध्यक्ष ह. भ. प. जगद्गुरू द्वाराचार्य डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर यांचे अध्यक्षस्थानी स्थान असेल. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचे सदस्य प्रा. दासू वैद्य आणि श्रीधर नांदेडकर, जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्रीनिवास भक्कड व प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांचे विशेष उपस्थित राहणार आहेत.

**संमेलनातील प्रमुख सत्रे:**प्रथम सत्र (२२ डिसेंबर) - दुपारी २.०० वाजता: 'संत साहित्यातील विश्वबंधुत्व' या विषयावर परिसंवाद होईल. या सत्राचे अध्यक्ष प्रा. सतीश बडवे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, निवृत्त विभाग प्रमुख) असतील. मुख्य वक्ते म्हणून पंढरपूर येथील ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर, गुरुदेव सेवा आश्रम मोझरी येथील ह. भ. प. हरिभाऊ वेरुळकर, छत्रपती संभाजीनगर येथील संत साहित्याचे अभ्यासक डॉ. दत्तात्रय डुंबरे, तसेच संत साहित्याचे अभ्यासक बसवराज कोरे मार्गदर्शन करतील.

दुसरे सत्र - दुपारी ४.०० वाजता: 'मानसिक स्वास्थ्य आणि संतविचार' या विषयावर मुलाखत होईल. या सत्रात मा. ह. भ. प. डॉ. यशोधन महाराज साखरे (आळंदी देवांची) यांची मुलाखत डॉ. प्रमोद कुमावत आणि डॉ. ऋषिबाबा शिंदे घेणार आहेत.

तिसरे सत्र - सायंकाळी ७.०० ते ९.०० वाजता: हिमशिखा, पुणे प्रस्तुत 'कीर्तावणी' हे संगीत नाट्य सादर केले जाईल. यात रुचिका खोत आणि स्वामिराज भिसे यांच्या प्रमुख भूमिका असतील. नाट्यद्वारे वारी, संतसंप्रदाय आणि विठोबाच्या भक्तीपरंपरेचे दृश्य रंगमंचावर साकारले जाईल.

**रविवार (दि. १४) चे कार्यक्रम:**सकाळी ८.०० वाजता: सुपसिद्ध गायक दिनेश संन्यासी, प्रसाद चौधरी आणि डॉ. मोहिनी रायबागकर यांनी अभंगवाणी कार्यक्रम सादर करणार आहेत.सकाळी १०.०० वाजता - दुसरे सत्र (Talk Show): 'रिंगण, वारी आणि कीर्तावणी' या विषयावर संवाद साधला जाईल. यात सचिन परब (संपादक, रिंगण मुंबई), मा. संदेश भंडारे (सुप्रसिद्ध छायाचित्रकार, पुणे) आणि मा. रुचिका खोत (प्रयोगशील नाट्यकलाकार, पुणे) सहभागी राहतील. संवाद साधक विश्वाधार देशमुख असतील.

**समारोप व हरिकीर्तन:**सकाळी ११.३० वाजता समारोप सोहळा होईल. अध्यक्षस्थानी पुरुषोत्तम बगडिया असतील, तर संमेलनाध्यक्ष डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर आणि ह. भ. प. प्रमोद महाराज जगताप (मुंबई) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. या प्रसंगी वारकरी संप्रदायातील ह. भ. प. भगवान महाराज आनंदगडकर, ह. भ. प. नानामहाराज पोखरीकर, ह. भ. प. सोनुने गुरुजी आणि ह. भ. प. अनिरुद्ध महाराज क्षीरसागर यांचा सत्कार केला जाणार आहे.

दुपारी २.०० ते ४.०० वाजता मा. ह. भ. प. प्रमोद महाराज जगताप (मुंबई) यांच्या हरिकीर्तनाने संमेलनाची सांगता होईल.संपूर्ण दोन दिवसांच्या या संमेलनात जालनेकर नागरिक, वारकरी सांप्रदायाचे बांधव, तसेच संत साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक समारंभाचा लाभ घ्यावा, असा आवाहन जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्रीनिवास भक्कड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, कार्यवाह डॉ. यशवंत सोनुने आणि संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.हा संमेलन वारकरी परंपरेच्या विचारांची, भक्तीची आणि साहित्याची अमूल्य अनुभूती देणारा एक अद्वितीय महापर्व ठरणार आहे.

# वाहनधारक व चालकांना उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** अलीकडील काळात ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चलन इत्यादी सेवांशी संबंधित बनावट वेबसाइट्स, फसवे मोबाईल ॲप्स (APKs), तसेच मोबाइल SMS/WhatsApp द्वारे पाठविल्या जाणाऱ्या खोट्या लिंक मोठ्या प्रमाणात नागरिकांना फसवित आहेत. यामुळे सर्व वाहन चालक / मालक यांची आर्थिक फसवणूक, वैयक्तिक माहितीची चोरी तसेच नागरिकांच्या ओळखीचा गैरवापर होत असल्याचे आढळून आले आहे.सर्व वाहन चालक मालक यांनी परिवहन विभागाच्या खालील अधिकृत शासकीय संकेतस्थळांचा वापर करावा : १) वाहन नोंदणी सेवा (VAHAN) - https://vahan.parivahan.gov.in २) ड्रायव्हिंग लायसन्स सेवा (SARATHI) - https://sarathi.parivahan.gov.in ३) परिवहन सेवा - https://www.parivahan.gov.in ४) ई-चलन पोर्टल - https://echallan.parivahan.gov.in वरील सर्व अधिकृत संकेतस्थळे .gov.in ने समाप्त होतात. .com, .online, .site, .in अशा डोमेनवरील कोणत्याही वेबसाइटवर नागरिकांनी उघडू नये. फसवणूक करणाऱ्यांकडून पाठविले जाणारे संदेश बहुधा खालीलप्रमाणे असतात : आपल्या वाहनाचे चलन बाकी असून त्वरित दंड भरण्याची धमकी देण्यात येते व अनधिकृत लिंक पाठविण्यात येऊन त्वरित दंड भरण्याचे संदेश प्राप्त होतात. DL (वाहन चालविण्याचा परवाना) सस्पेंड होणार आहे. त्वरित तपासणी करा. RTO कार्यालय किंवा परिवहन विभागाकडून नागरिकांच्या मोबाईलमध्ये कधीही WhatsApp द्वारे पेमेंट लिंक पाठविली जात नाही, याची नोंद घ्यावी. तसेच, RTO Services apk, mParivahanšUpdate apk, eChallanšPay.apk अशाअनधिकृत APK ॲप्सडाउनलोड करू नयेत, कारण त्याव्दारे जढझ, बँकिंग माहिती व मोबाईलमधील इतर संवेदनशील माहिती चोरीला जाण्याची शक्यता असते. नागरिकांनी कोणताही संशयास्पद संदेश, लिंक प्राप्त झाल्यास तात्काळ National Cyber Crime Portal - https://www.cybercrime.gov.in ठिकाणी तक्रार नोंदवावी.

सायबर फसवणूक हेल्पलाईन १९३० जवळचे जिल्हा सायबर पोलीस स्टेशन यांच्याशी संपर्क साधावा. असेही उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## २२ डिसेंबर रोजी डाक अदालतीचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** देशातील पोस्टल सेवा ही सामाजिक आर्थिक जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकाच्या मनामध्ये अपरोक्षपणे डाकघराच्या सेवेने एक वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण करुन प्रभावित केले आहे. पोस्ट खाते हे नागरिकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना, संभाषणामध्ये, पत्रव्यवहारामध्ये किंवा सेवेमधील काही त्रुटीमुळे असे काही प्रसंग निर्माण होतात की त्यामुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रार करण्याची वेळ येते. या तक्रारीचा योग्य प्रकारे न्याय निवाड़ा करण्यासाठी पोस्ट खात्याने वेळोवेळी डाक अदालत घेण्याचे ठरविले आहे. त्यामधे पोस्ट विभागाचे अधिकारी तक्रार सोडविण्याचा प्रयत्न करतात. दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता प्रवर अधिक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयामधे डाक अदालत आयोजित करण्यात आली आहे. असे प्रवर अधिक्षक डाकघर, छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची वरिष्ठ पोलीस अधीक्षकपदी पदोन्नती; भाजपा नेत्यांकडून शुभेच्छा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांना नुकतीच वरिष्ठ पोलीस अधीक्षक (SSP) पदावर पदोन्नती मिळाली. यानिमित्त जालना महानगर भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी त्यांचा सत्कार करून मनःपूर्वक अभिनंदन केले आणि पुढील सेवाकार्यासाठी शुभेच्छाही दिल्या.



यावेळी दोघांमध्ये जालना शहरातील कायदा व सुव्यवस्था, नागरिक सुरक्षा, गुन्हेगारी प्रतिबंध, वाहतूक व्यवस्थापन, गस्त पथकांची वाढ, सीसीटीव्ही निरीक्षण, महिला सुरक्षा उपक्रम अशा विविध विषयांवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाली. पदोन्नतीनंतरही पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी जालना जिल्ह्याच्या सुरक्षेसाठी अधिक काम करण्याचा आपला विश्वास व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813